१

पुणे जिल्हा परिषद,पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन.
शिक्षण(माध्यमिक)विभाग.
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/अनुदान/०५.
पुणे. दि.३१/३/२००५.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
शारदाबाई पवार विद्यालय,
आंबेगव्हाण, ता. जुन्नर, जि. पुणे.

विषय : सन २००४-०५ या आर्थिक वर्षात आदिवासी क्षेत्रातील अनुदानित माध्यमिक शाळांना जोडलेल्या इ.५ वी ते इ.७ वी चे वर्ग/तुकडयांना अनुदान मंजूर करणेबाबत.

संदर्भ : मा.शिक्षण उपसंचालक,(माध्यमिक),महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचेकडील पत्र क्र. अमाशा-१२०२/५ते७ आदि.अनु/१५-क, दिनांक ३१/३/२००५.
२)शासन पत्र समक्रमांक दिनांक ३१/३//२००५.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपल्या शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण ,ता.जुन्नर, जि.पुणे या माध्यमिक शाळेस जोडलेल्या इ.५ वी ते इ.७ वी चे वर्ग/तुकडयांना शासन निर्णय दिनांक ३१/३/२००५ अन्वये वेतन व वेतनेतर खर्चाच्या १०० टक्के वेतन अनुदान मंजूर करणेत आलेले आहे. तरी सन - २००४-२००५ या आर्थिक वर्षासाठी आपल्या माध्यमिक शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांची वैयक्तिक मान्यता या कार्यालयाकडून घेवून माहे ——→ फेब्रुवारी २००५ या ——→ महिन्यांचे वेतन देयक तयार करुन वेतन पथकाकडे त्वरित सादर करावे.

| मान्यताप्राप्त वर्ष/वर्ग | | अनुदान टप्पा |
|---|---|---|
| सन ९९-२००० | इ.५ वी | १०० टक्के |

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
पुणे जिल्हा परिषद,पुणे.

प्रत : माहितीसाठी व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे १.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५वी/९९
पुणे, दि. ३.७.९९

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण.
ता. जुन्नर. जि. पुणे.

विषय :- इ.५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करणेस परवानगी मिळणेबाबत.

संदर्भ :- मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे कडील पत्र क्र. माध्य ३-९९/५वी ते ७वी/पुवि/२/७४९४, दि. २९.६.९९

उपरोक्त विषयसंदर्भान्वये आपणास कळविणेत येते की, आपल्या माध्यमिक शाळेत इ.५वीचा वर्ग सुरू करणेस जून ९९ पासून खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर परवानगी देणेत येत आहे.

अटी : १. इ.५वी ते ७ वी चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्वावर राहील.

२. मा.शा.संहिता नियम ३.२नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.

३. वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश/नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.

४. पटसंख्या किमान ३० असावी या अटीवर मान्यता राहील.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे. करिता

प्रत,

गट शिक्षणाधिकारी, पं.स.

२/- माध्यमिक शाळा तपासणीचे वेळी ~~[illegible]~~ इ.५ वीच्या वर्गाची तपासणी करणेत यावी.

क्र. : माध्य. ३ /१३ / ५ वी ते ७ वी / पुवि / २ ७४९४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे -१, यांचे कार्यालय
दिनांक : 28 JUN 1999

प्रति,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),

जिल्हा परिषद पुणे

विषय - इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग माध्यमिक शाळेत सुरू करण्यास परवानगी देणेबाबत.

शाळा : - शारदाबाई पवार विद्यालय, अंबेगव्हाण, ता. जुन्नर

संदर्भ :- आपले पत्र क्र. शिक्षण/माध्य/ह-४/५ वी/९८, दि. १०.८.९८

उपरोक्त विषयाधीन संदर्भाच्या पत्रान्वये कळविण्यात येते की, सन १९८३-८४ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी दिलेल्या नवीन माध्यमिक शाळांना इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग नव्याने सुरू करण्यास परवानगी देण्याबाबत शासनाचे पत्र क्र. १०९७/[५२८]/९९/माशि-१, दि. १.३.९९ एसएसएन/१०८९ / २३४८५/ (२७४-एम) माशि-१, दिनांक २९-१-८९ व २०-१२-८८ च्या शासन आदेशानुसार विभागीय शिक्षण उपसंचालकांना अधिकार प्रदान केलेले आहेत.

२/- सदर अधिकारांच्या अधिन राहून, खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेच्या शारदाबाई पवार विद्यालय, अंबेगव्हाण, ता. जुन्नर [आदिवासी] या माध्यमिक विद्यालयांत इ. ५ वी ते ७ वी चे वर्ग सुरू करण्यास सन १९९९ या शैक्षणिक वर्षापासून विना अनुदान तत्त्वावर परवानगी देण्यात येत आहे.

अटी - १) इ. ५ वी ते ७ वी चे वर्गाची परवानगी ही विनाअनुदान तत्त्वावर राहील.
२) मा. शा. संहिता नियम ३.२ नुसार सर्व अटींची पूर्तता शाळेने करणे आवश्यक आहे.
३) वेळोवेळी निर्गमित करण्यात येणारे शासन आदेश / नियम संस्थेवर बंधनकारक राहतील.
४] पटसंख्या किमान ३० असावी या अटीवर मान्यता राहील.

वरीलप्रमाणे संबंधितांस कळवावे. शाळेने सुरू केलेल्या सदर वर्गाची तपासणी वार्षिक तपासणीचे वेळी करावी व त्याबाबतचे योग्य ते अभिप्राय तपासणी अहवालामध्ये नमूद करावेत.

[illegible] शि. उ. सं. यांची
सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे -१

प्रत - १) मा. अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, विस्तारभवन मुंबई ३२, यांना सविनय सादर

२) मुख्याध्यापक, शारदाबाई पवार विद्यालय, अंबेगव्हाण
ता. जुन्नर.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा/
२०००-२००१
पुणे. दि. १०/६/२०००.

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

~~शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण.~~
~~ता. जुन्नर, जि. पुणे.~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन २००० -२००१

~~शारदाबाई पवार विद्या. आंबेगव्हाण,~~ जि. पुणे.
इ. ६वी, ~~इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी.~~

आपल्या ~~श्री गजानन महाराज शि. संस्था, ओतूर~~ या संस्थे-
व्दारा संचलित ~~शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण~~ ह्या माध्य. शाळेत ~~इ. ८वी~~/इ. ५वी चा वर्ग [मराठी/~~इंग्रजी~~] सुरु करणेस सन ९९-२००० या. शै. वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/३/१३/५ ते ७/क्रुवि/७५५४/९९ दि. २८/६/९९ अन्वये शासन परवानगी मिळालेली आहे. सन २००० -२००१ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ~~इ. ७वी, इ. ९वी, इ. १०वी~~ चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००० पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देण्यात येत आहे. सदर वर्गाच्या वार्षिक तपासणीबाबत आपण संबंधित उपशिक्षणाधिकारी, ~~जि. प. पुणे~~/गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर. जि. पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर करण्यात यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वीचा नैसर्गिक वाढीने सुरू आहेत अशा माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी आवश्यकती सर्व कागदपत्रा जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

J. N. H. [signature]
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा/
२००१-२००२
पुणे. दि.
20/5/2001

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,

शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण.
ता. जुन्नर.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. सन २००१-२००२
शारदाबाई पवार विद्या. आंबेगव्हाण ता. जुन्नर जि. पुणे.
~~इ. ६वी~~, इ. ७वी, ~~इ. ९वी~~, ~~इ. १०वी~~.

आपल्या श्री गजानन महाराज शिक्षण संस्था या संस्थे-
व्दारा संचलित शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण ह्या माध्य.
शाळेत ~~इ. ८वी~~/इ. ५वी या वर्ग [मराठी/~~इंग्रजी~~] सुरु करणेस सन ९९-२००० या. शै.
वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य/3193/
5नेजापुवि/7-55/400 दि.28/6/00 अन्वये शासन परवानगी मिळालेली आहे.
सन २००१-२००२ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी~~,
इ. ७वी, ~~इ. ९वी~~, ~~इ. १०वी~~ या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास
जून २००१ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. सदर वर्गाच्या वार्षिक
तपासणीबाबत आपण संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि. प. पुणे/गट शिक्षणा-
धिकारी, पंचायत समिती जुन्नर जि. पुणे यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा.
वेळेत तपासणी करुन घेऊन अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

~~ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वीचा नैसर्गिक वाढीने सुरु आहेत
अशा माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक
मिळणेसाठी लागणारी आवश्यकती सर्व कागदपत्रा जून मध्ये सादर करणे आवश्यक
आहे.~~

J.N.H.
शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
पुणे जिल्हा परिषद
शिक्षण विभाग
जा.क्र./शिक्षण/माध्य/६४/४८९९
पुणे - १. दिनांक - ३०/३/९९.

मुख्याध्यापक,

शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण.
ता. जुन्नर.

विषय - वेतन अनुदान मंजूर करणेबाबत.
सन- १९९८ - ९९.

संदर्भ - मा. शि. संचालक, मा. शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, यांचे दि. २९/३/९९. चे आदेश.

उपरोक्त विषयसंदर्भान्वये कळविणेत येते की, आपल्या माध्यमिक शाळेस जून १९९८ पासून ~~५० %~~ / १०० % वेतन अनुदान - ~~इ. ५ वी ते १० वी~~ / इ. ८ वी ते १० वी मंजूर करणेत आलेले आहे.

तरी आपण सदर वर्गासाठी सन १९९८ - ९९ या शै-वर्षी नियुक्त केलेल्या शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता घेवून वेतन देयके त्वरीत वेतन ... पथक व भविष्य निर्वाह निधी यांचे कार्यालयाकडे सादर करावीत.

शिक्षणाधिकारी ( माध्य )
जिल्हा परिषद, पुणे.

तात्काळ

जा. क्र. माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/
९४-९५,
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक:- ५/१/१९९५

19 JAN 1995

प्रति,
सचिव,

श्री मजाबब महाराज शिक्षण संस्था

ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे

विषय:- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक:-एसएसएन- १०९४/ ५११५ /माशि-१, दि. १५/१०/९४

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदोला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून-१९९४ पासून विनाअनुदान तत्वावर/~~कायम विनाअनुदान~~ तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन-१०८८/१६६९-एन, माशि-१, दि. १०. २. ८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रांनुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशाचे [उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] ~~सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक~~ असणे आवश्यक आहे.

४] ~~इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी~~ भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही ~~प्रकारे~~ प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [ई. बी. सी.] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या ~~कार्यालयाकडे~~ कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकड्यांतून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

..२/- कृ. मा. प.

९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्य.]यांचेकडून मंजूर करून घेण्यांत येईल.

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्यावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधा-सह ठेवण्यात येतील.

१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्वपरवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-
=======

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळापैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

वरील बाबीपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री गजानन महाराज शिक्षण संस्था, ओतूर | आळेफाटा ता.जुन्नर | आठवी जून ९४ पासून | मराठी |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरू झाल्यापासुन एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी :-

१] शिक्षणाधिकारी [माध्यमिक]जि.प. पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमुद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरूध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणा-या अधिका-यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२,

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र. शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/९५
पुणे, दि. ७।८।९५

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

BOOK-POST

शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण
ता. जुन्नर, जि. पुणे.

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९५-९६, इ. ६ वी, ७वी, ९वी, १०वी.

आपल्या श्री गजानन महाराज शि. संस्था द्वारा संचलित शारदाबाई पवार विद्यालय, ह्या माध्यमिक शाळेतील इ.८वी/५ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९४ - ९५ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य २(७) नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि. २१।७।९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९५ - ९६ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत इ. ६ वी, ७ वी, ९ वी, १० वी च्या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, शिक्षण-माध्यमिक जि.प.पुणे/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्य. शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ३० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे आवश्यक आहे.

(सही)
शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे करिता.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वाढ/ ९६
पुणे, दि. ८/७/९६

BOOK-POST

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,

~~शारदाबाई पवार विद्यालय, आंबेगव्हाण.~~

~~ता. जुन्नर. जि. पुणे.~~

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत.

सन १९९६-९७, इ. ~~८ वी, ९वी, ९वी~~, १०वी.

आपल्या गजानन महा. शिक्षण संस्था द्वारा संचालित शारदाबाई पवार विद्या. आंबेगव्हाण च्या माध्यमिक शाळेतील इ.८वी/९ वी चे वर्गास ( माध्यम मराठी/इंग्रजी ) सन १९९८-९९ या शैक्षणिक वर्षापासून मा.शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य ३(७७) नमाशा/मान्यता/पुवि/९४ दि. ९।३।९५ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन १९९६-९७ या शैक्षणिक वर्षापासून आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ.८ वी, ७ वी~~, ९ वी, १० वी चा वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत असून सदर वर्गास परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी उपशिक्षणाधिकारी, ~~शिक्षण माध्यमिक जि.प.पुणे~~/ गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जुन्नर यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये इ. १० वी वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे त्या माध्यम शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयात संकेतांक मिळणेसाठी लागणारी कागदपत्रे माहे जून मध्ये सादर करणे **आवश्यक** आहे.

शिक्षणाधिकारी (माध्य)
जिल्हा परिषद पुणे.करिता.